# माहितीपत्रक

## हरिदास शिंदे – लोककलेचा जागतिक वारसदार

### १) पारंपरिक गोंधळी परंपरेचे पाईक

छत्रपती शिवरायांच्या दरबारातील गोंधळी अज्ञानदास यांचे सतरावे वंशज हरिदास शिंदे हे नगर तालुक्यातील हातवळण गावचे सुपुत्र. वडील परम पूज्य वै. पुरुषोत्तम महाराज शिंदे हे प्रसिद्ध कीर्तनकार, त्यांच्या कडून लोककलेचा वारसा लाभला.

### २) शैक्षणिक व संगीतप्रवास

- प्राथमिक शिक्षण - आळंदी
- उच्च शिक्षण - पुणे
- वै. पांडुरंग महाराज वैद्य यांच्याकडे १४ वर्षे मृदंगाचे शिक्षण
- लहान वयातच मृदंग, गायन, कीर्तन व भजन यामध्ये प्रावीण्य
- संगीत अलंकार व संगीत एम.ए. अशा पदव्या प्राप्त

### ३) संकटात मिळालेली देवीची कृपा

घरच्या अडचणीमुळे आळंदीतून गावाकडे परतावे लागले. चिंतेत असताना आई भवानीचा साक्षात्कार झाला. अवघ्या ९व्या वर्षी संबळ वाजवण्याची कला आत्मसात केली.

### ४) कुटुंबाची भूमिका

आई शोभाबाई शिंदे यांनी तीन मुलांना मोठ्या कष्टाने शिकवले. मोठे बंधू ॲड. पांडुरंग शिंदे (संगीत अलंकार), तर धाकटे बंधू प्रा. हरिदास शिंदे यांनी आईवडिलांच्या कलेचा वारसा आंतरराष्ट्रीय पातळीवर नेला.

### ५) संस्थात्मक कार्य

- लोकसंस्कृती कला सेवा संघ या संस्थेच्या माध्यमातून लोककला आणि लोकसंस्कृतीचा प्रचार व प्रसार
- २०१७ साली रणधुमाळी संबळ पथकाची स्थापना
- “वारसा महाराष्ट्राचा” या उपक्रमांतर्गत २५०० हून अधिक कार्यक्रम

### ६) चित्रपट सादरीकरण

फत्ते शिकस्त, पावनखिंड, हंबीरराव, आनंदी गोपाळ, एक होतं माळीण या चित्रपटांत पार्श्वगायन व पारंपरिक वाद्यांचे सादरीकरण.

### ७) मान्यताप्राप्त पुरस्कार

- लोकमान्य टिळक पुरस्कार, पुणे

- अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पुणे
- स्वामी विवेकानंद पुरस्कार, २०१२
- अनन्य सन्मान, २०१७
- सरगम सन्मान, अहमदनगर २०१९
- मटा सन्मान नामांकन, २०२३
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून अमेरिकेत गौरव

मन:पूर्वक अभिवादन!
लोककलेचे जागतिक दूत – हरिदास शिंदे यांना मानाचा मुजरा!